# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०५/२०२४ (सोमवार) सकाळ

---

## MIDC बुट्टीबोरी परीसरातील कंपनीमध्ये झालेल्या चोरीचा गुन्हा MIDC बुट्टीबोरी पोलीसांनी अवघ्या १२ तासाचे आत केला उघड

फिर्यादी हरीशंकर रामसुरत पांडे, वय ४७ वर्षे, रा. नागपुर यांनी पोलीस स्टेशन येथे येवुन रिपोर्ट दिली की, ते MIDC बुट्टीबोरी परीसरामध्ये असलेल्या करमतारा इंजिनियरींग कंपनी येथे HR या पदावर कार्यरत आहेत. दिनांक ०४/०५/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. पासुन ते कर्तव्यावर हजर होते. नेहमीप्रमाणे सायंकाळी ते काम संपल्यावर कंपनीमधुन घरी निघुन गेले. कंपनीमधुन जातेवेळी त्यांनी कंपनीमध्ये असलेल्या इलेक्ट्रोप्लेट विभागामध्ये प्लास्टीकच्या ११ पोत्यांमध्ये अंदाजे ३०० किलो लोखंडी वायसर भरुन ठेवले होते. दिनांक ०५/०५/२०२४ रोजीचे सकाळी ०७.०० वा. फिर्यादी हे घरी हजर असताना त्यांना कंपनीमधील सुरक्षारक्षक याने फोन करुन इलेक्ट्रोप्लेट विभागात ठेवलेले ११ किलो गोण्यांमधील ३०० किलो लोखंडी वायसर दिसुन येत नाही. ते कोणीतरी चोरुन नेले आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी कंपनीमध्ये जावुन पाहिले असता कंपनीमध्ये असलेल्या इलेक्ट्रोप्लेट विभागामध्ये प्लास्टीकच्या ११ पोत्यांमध्ये अंदाजे ३०० किलो लोखंडी वायसर किंमती ४०,०००/– रु कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची खात्री झाल्यानंतर ते पोलीस स्टेशन येथे आले. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करुन त्याचा तपास सुरु करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्याचे उद्देशाने पोलीस स्टेशन MIDC बुट्टीबोरी येथील अधिकारी अंमलदार यांनी पोलीस स्टेशन परीसरामध्ये आरोपी व गेलेल्या मालाचा शोध सुरु केला असता गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम हे मोटारसायकलने MIDC बुट्टीबोरी परीसरात फिरत असुन त्यांचेकडे असलेले लोखंडी सामान ते विकण्याच्या तयारीत आहेत अशी खात्रीशिर माहिती प्राप्त झाली. दोन्ही इसमांचा शोध घेण्याच्या उद्देशाने पेट्रोलिंग सुरु असताना दोन इसम हे दोन मोटारसायकलसह MIDC बुट्टीबोरी परीसरात मिळुन आले. त्यांना ताब्यात घेवुन विचारपूस केली असता त्यांनी करमतारा इंजिनियरींग मधुन लोखंडी वायसर चोरी केल्याची कबुली दिली. त्यांचेकडे असलेल्या मोटारसायकलबाबत त्यांना विचारले असता त्या देखील चोरीच्या असल्याचे त्यांनी सांगितले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांची नावे १) महेश चंद्रभान टेकाम, वय ४० वर्षे, रा. आमगाव, जि. वर्धा २) किशोर मारोती गुंजेकर, वय २८ वर्षे, रा. गिरोली वस्ती, ता. जि. भंडारा अशी असुन त्यांचे ताब्यातुन १) ०८ पोत्यांमध्ये असलेले ३०० किलो लोखंडी वायसर किंमती ४०,०००/–रु. २) जुनी वापरती पल्सर मोटारसायकल क्रमांक MH-32/AE-9717 किंमत ४०,०००/– रु ३) जुनी वापरती हिरो होंडा सिडी डिलक्स क्रमांक MH-31/DG-3917 किंमत ३५,०००/– रु असा एकुण १,१५,०००/– रु. चोरीचा माल त्यांचे ताब्यातुन जप्त केला. सदर गुन्हयातील आरोपी यांना अटक केली असुन त्यांचेकडुन जप्त केलेल्या मोटारसायकलबाबत अधिक माहिती प्राप्त करुन गुन्हयाचा तपास करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सहा. पो.नि राजीव कर्मलवार, पोउपनि सुशिल सरकार,

पोउपनि राम खोत, पोलीस अंमलदार अरुण जयसिंगपुरे, लक्ष्मण बन्ने, संतोष तिवारी, पुजा इंगळे, श्रीकांत गौरकार, विनायक सातव, दिलीप नवले, विशाल डेरकर, उज्वल कोठे यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर